# बृहन्मुंबई महानगरपालिका
## मुंबई अग्निशमन दल

मुंबई अग्निशमन दल नित्य परिपत्रक क्र. 01 दि. 02.04.2025

**विषय:** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारणा अधिनियम २०२३ च्या तरतुदीनुसार ''अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी'' आकारणे व सध्याच्या प्रचलित ''पडताळणी शुल्क'' आकारणीबाबत.

**संदर्भ:** १. मु.अ.द. नित्यपरिपत्रक क्र. ७८ दि. १५.०३.२०२४
२. मु.अ.द. नित्यपरिपत्रक क्र. ८८ दि. १९.०३.२०२५
३. शासन परिपत्रक क्र. जा.क्र.का.१५/वामुदत/२०२५-२६/३८७ दि. ३१.०३.२०२५
४. म.अ.से.-२०२५/५९/६२२ दि. ०१.०४.२०२५

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारणा अधिनियम २०२३ च्या तरतुदीनुसार मुंबई अग्निशमन दलामार्फत, **अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी** सुधारित दराने वसूल करण्यासाठी मु.अ.द. नित्यपरिपत्रक क्र. ८८ दि. १९.०३.२०२५ अन्वये निर्देश प्रसारित करण्यात आले आहेत. सदर परिपत्रकामध्ये अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी आकारण्याकरिता परिपत्रक मु.अ.द. नित्यपरिपत्रक क्र. ७८ दि. १५.०३.२०२४ च्या आधारे परिगणन करण्याचे निर्देशीत केले आहे.

तथापि, महाराष्ट्र मुद्रांक नियम १९९५च्या तरतूदी अन्वये प्रसिद्ध केलेल्या दर विवरणपत्रामध्ये वार्षिक मुल्यदर तक्ते, (ASR)च्या दरांमध्ये शासनाच्या परिपत्रक क्र. जा.क्र.का.१५/ वामुदत/२०२५-२६-/३८७ दि. ३१.०३.२०२५ नुसार सुधारणा करण्यात आली असून, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारणा अधिनियम २०२३ मधील **सुधारित अनुसूची दोन** प्रमाणे अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी संरचना ही खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९९५ च्या तरतुदी अन्वये प्रसिध्द केलेल्या वार्षिक मुल्यदर तक्ते **(एएसआर)** टक्केवारीनुसार इमारतीच्या विविध प्रवर्गासाठी बांधीव क्षेत्राच्या प्रती चौरस मीटर प्रमाणे दिनांक ०१/०४/२०२५ पासून खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आकारणीची अंमलबजावणी करण्यात यावी.

तक्ता-1

| अ.क्र. | इमारतीची उंची मीटरमध्ये | वार्षिक दर विवरणपत्राच्या टक्केवारीनुसार (एएसआर) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवासी इमारत | संस्थेची इमारत | वाणिज्य इमारत | औद्योगिक इमारत |
| 1 | 45 मी. पर्यंत उंचीच्या इमारती | ०.२५% | ०.५०% | ०.७५% | ०.७५% |
| 2 | 45 मी.पेक्षा जास्त उंचीच्या इमारती | ०.५०% | ०.७५% | १.००% | १.००% |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे फी चे निर्धारण करण्यासाठीच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र मुद्रांकन (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारण करणे) नियम 1995 च्या तरतुदी अन्वये प्रसिध्द केलेल्या वार्षिक दर विवरणपत्रातील दर हे महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी व मुद्रांकन विभागाने निर्गमित केलेले बांधकाम दर असतील. त्या अनुषंगाने शासनाने प्रसारित केलेल्या सुधारीत दरांनुसार, पक्के बांधकामासाठी सन २०२५-२६ करीता रूपये ३१,७६३/- निर्धारित करण्यात आले आहेत. त्यानुसार वरील तक्त्यात दर्शविण्यात आलेले विविध प्रवर्गासाठीची टक्केवारी व सन २०२५-२६ करीता निश्चित करण्यात आलेले बांधकाम दर यांचा विचार करता, खालीलप्रमाणे प्रती चौरस मीटर दराने ''अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी'' आकारण्यात यावी. सदर दर नजीकच्या रुपयामध्ये खालील प्रमाणे पुर्णांकित करण्यात आलेले आहेत.

तक्ता-2

| अ.क्र. | इमारतीची उंची मीटरमध्ये | प्रती चौरस मीटर आकारण्यात येणारे दर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवासी इमारत | संस्थेची इमारत | वाणिज्य इमारत | औद्योगिक इमारत |
| 1 | 45 मी. पर्यत उंचीच्या इमारती | रू. ८० | रू. १५९ | रू. २३९ | रू. २३९ |
| 2 | 45 मी.पेक्षा जास्त उंचीच्या इमारती | रू. १५९ | रू. २३९ | रू. ३१८ | रू. ३१८ |

मु.अ.द. नित्यपरिपत्रक क्र. ७८ दि. १५.०३.२०२४ मधील निर्देशांनुसार, वर दर्शविल्या प्रमाणे परिगणित केलेल्या ''अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी''च्या १०% दराने पडताळणी शुल्काची आकारणी करण्यात यावी.

**प्रमुख अग्निशमन अधिकारी**

प्रत रवाना

1. सर्व उप. प्रमुख अग्निशमन अधिकारी/कार्यकारी अभियंता (यां व वि.)
2. सर्व विभागिय अग्निशमन अधिकारी/ सर्व सहाय्यक विभागिय अग्निशमन अधिकारी
3. कार्यभारी अधिकारी ------------ अग्निशमन केंद्र
4. सर्व प्रशासकीय अधिकारी व मुख्य लिपीक